# कोतवाल भरती प्रक्रीया २०२३
# मुंबई उपनगर जिल्हयाच्या आस्थापनेवरील
# कोतवाल भरतीसाठी जाहीरनामा

**क्रमांक**: तह अंधेरी/आस्थापना/ कोतवाल भरती-२०२३ दि. ०५/०७/२०२३

या जाहीरनाम्याद्वारे जाहीर करण्यात येते की, शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाच्या तरतूदींच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अधिपत्याखालील तहसिलदार अंधेरी, बोरीवली, कुर्ला यांच्या आस्थापनेवरील कोतवाल संवर्गाची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून या जाहीरनाम्याद्वारे **दिनांक ०५/०७/२०२३ पासून ते दि. १७/०७/२०२३** रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. या जिल्ह्यातील रिक्त कोतवाल पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे.

## कोतवालांच्या रिक्त पदांचे आरक्षण

### तहसिलदार अंधेरी

| एकूण रिक्त पद संख्या | | अराखीव (खुला) (३८%) | अ.जा. (१३%) | अ.ज. (७%) | वि.जा. अ(३%) | भ.ज.ब. (२.५%) | भ.ज.क(३.५%) | भ.ज.ड. (२%) | विमाप्र(२%) | इमाव (१९%) | ईडब्ल्यू एस (१०%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सर्व साधा. | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ०२ | ०१ |
| | महिला ३०% | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ |
| **१४** | **एकूण** | **०३** | **०२** | **०१** | **०१** | **०१** | **०१** | **०** | **०** | **०३** | **०२** |

### तहसिलदार बोरीवली

| एकूण रिक्त पद संख्या | | अराखीव (खुला) (३८%) | अ.जा. (१३%) | अ.ज. (७%) | वि.जा. अ(३%) | भ.ज.ब. (२.५%) | भ.ज.क(३.५%) | भ.ज.ड. (२%) | विमाप्र(२%) | इमाव (१९%) | ईडब्ल्यू एस (१०%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | सर्व साधा. | ० | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **०४** | **एकूण** | **०** | **०१** | **०१** | **०१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |

### तहसिलदार कुर्ला

| एकूण रिक्त पद संख्या | | अराखीव (खुला) (३८%) | अ.जा. (१३%) | अ.ज. (७%) | वि.जा. अ(३%) | भ.ज.ब. (२.५%) | भ.ज.क(३.५%) | भ.ज.ड. (२%) | विमाप्र(२%) | इमाव (१९%) | ईडब्ल्यू एस (१०%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | सर्व साधा. | ०१ | ० | ०१ | ०१ | ० | ०१ | ० | ० | ०१ | ०१ |
| | महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ० |
| **०७** | **एकूण** | **०१** | **०** | **०१** | **०१** | **०** | **०१** | **०** | **०** | **०२** | **०१** |

**टिप:-** रिक्त पदांच्या एकूण संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. सदर बदल करण्याबाबतचे अधिकार किंवा भरती प्रक्रीया अंशतः किंवा पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

**कोतवाल भरती प्रक्रीयेकरीता सर्वसाधारण अटी व शर्ती या खालीलप्रमाणे असतील-**

**१. अर्हता :-**

१.१. शैक्षणिक अर्हता किमान चौथी पास

१.२. अर्जदाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांका रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.

१.३. अर्जदार हा कोतवाल पदाची कर्तव्य पार पाडण्यास सक्षम असला पाहीजे.

१.४. अर्जदार ज्या तालुक्याच्या कोतवाल पदासाठीचा अर्ज सादर करणार आहे, त्या तालुक्यातील स्थानिक रहिवासी असावा व त्या तालुक्याची त्या अर्जदारास माहिती असणे आवश्यक आहे.

१.५. राखीव जात प्रवर्गात कोतवाल पदी नेमणूक झालेनंतर ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्राची प्रत उमेदवाराने सादर करणेबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१.६ निवड झालेल्या उमेदवारांनी शारीरिक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**२. कामकाजाचे स्वरूप:-**

२.१. कार्यालयीन आवारातील स्वच्छता, साफसफाई करणे

२.२. कार्यालयीन दप्तर वाहून नेणे

२.३. कार्यालयीन टपालाची ने-आण करणे, नोटीस बजावणे

२.४ दवंडी पिटवणे

२.५ सरकारी मालमत्तेचे संरक्षण करणे

याव्यतिरिक्त वेळोवेळी वरीष्ठ अधिकाऱ्यांनी सोपविलेली इतर कामे पार पाडावी लागतील.

३. शासन सामान्य प्रशासन /महिला बाल विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील निर्णय/परीपत्रक दिनांक १६/४/१९८१, २७/१०/२००९, १९/०९/२०१३, १/७/२०१६, २१/१/१९८०, २७/०८/२००९, ०४/११/२०१६, ०२/०५/१९९८, २८/०७/२०१४ व २/०४/२०१८ अन्वये समांतर आरक्षण हे वर्ग अ ते ड या गटातील पदांसाठी लागू असलेने व महसूल व वन विभागातील कोतवाल हे पद अवर्गीकृत असलेने समांतर आरक्षण लागू होत नाही. सबब अपंग, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त, अंशकालीन खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागू असणार नाही.

**४. सेवाशर्ती:-**

४.१. कोतवालांची नेमणूक ही पूर्णतः मानधन तत्त्वावर आहे तसेच सदर नेमणूक ही पूर्णतः अस्थायी व अवर्गीकृत स्वरुपाची आहे.

४.२ कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्यामुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाहीत.

४.३ कोतवाल हा पूर्ण वेळ शासनाचा सेवक असेल.

४.४ कोतवालाची नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

४.५ या जाहिराती अन्वये करण्यात येणाऱ्या भरतीमध्ये संपूर्ण तालुका हा एक घटक गृहीत धरला असल्यामुळे होणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांचा कोणताही विचार न करता तालुका अंतर्गत रिक्त असलेल्या कोणत्याही तलाठी सझाचे ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल व नियुक्त उमेदवार हे तालुका अंतर्गत बदलीस पात्र राहतील. त्याकरिता उमेदवाराने रुपये १००/- चे बंधपत्र देणे आवश्यक आहे.

४.६ कोतवालास मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

**५. परीक्षेचे स्वरूप:-**

५.१ सदर भरतीकरीता लेखी परीक्षा ही १०० गुणांची असेल.

५.२ लेखी परीक्षा ही **दि. ०६/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते १२.००** या वेळेत उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या केंद्रावर घेण्यात येईल. तसेच कोणत्याही आपत्कालीन कारणास्तव परीक्षा स्थगीत ठेवावी लागल्यास पुढील परीक्षेची वेळ, ठिकाण व दिनांक उमेदवारास त्याने अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांक, ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. अशा वेळी प्रथम परीक्षेचे प्रवेशपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

५.२ मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही.

५.३. लेखी परीक्षा ही ५० प्रश्नांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची बहुपर्यायी असेल.

५.४ सदर परीक्षेसाठी खालील नमूद विषयांवर प्रश्नपत्रिका असेल-
सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी, मराठी, गणित, विज्ञान, इतिहास व नागरीकशास्त्र, भुगोल व मुंबई उपनगर जिल्हयातील संबंधीत प्रश्न.

५.५ परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

**५.६. OMR शीट (उत्तरपत्रिके) बाबत सूचना:-**

१. उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळावी, ती चुरगळणार नाही, फाटणार नाही, खराब होणार नाही, त्यावर कोणतीही खाडाखोड होणार नाही याची उमेदवाराने दक्षता घ्यावी.

२. लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेची OMR शीट प्रमाणे तपासणी होणार असल्या कारणाने उत्तरे लिहीण्यासाठी अथवा योग्य पर्यायावर भरीव वर्तुळाने चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईचे बॉल पॉईंट पेन वापरावे.

३. उत्तरपत्रिकेच्या OMR शीटवर विहीत ठिकाणी परीक्षेचे नाव, प्रश्नपत्रिका संच क्रमांक, बैठक क्रमांक, प्रश्नपत्रिका क्रमांक योग्य ठिकाणी व अचूकपणे नमूद करून विहीत ठिकाणी स्वाक्षरी करावी.

## ६. सामाजिक आरक्षण:-

६.१. रिक्त पदांची संख्या, आरक्षण / अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी विहित केलेले आरक्षण नियमानुसार अनुज्ञेय असेल.

६.२ महिलांसाठी ३०% प्रमाणे आरक्षित पदे महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.१/२००१ /मक्षा २०००/प्र.क्र. १५/का. २. दि. २५.०५.२००१ अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

६.३ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

६.४ महिला समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता क्र. महिआ२०२३/प्र. क्र. १२३/कार्या-२ अन्वयेच्या दि. ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निदेशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता गुणवत्तेच्या आधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निदेशांतील मुदा क्र. ४ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.५ अ. जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील सर्व स्त्री/पुरुष उमेदवारांनी ते त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. (सन २०२३-२४ या वर्षाकरीता वैध असलेले)

६.६ महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या 'शासन निर्णय क्र. बीसीसी/२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत संबंधित जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा संपुष्टात येईल. तसेच उमेदवार ज्या जात प्रवर्गात मोडत आहे त्या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

६.७ इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

६.८ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ व दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**७. अर्जाचे वितरण ठिकाण:-**

सदर पदासाठी करावयाचा अर्जाचा नमुना **दि. ०५/०७/२०२३ पासून ते दि. १७/०७/२०२३** या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी खालील नमूद तहसील कार्यालयांतून शुल्क रु. २०/- भरून वितरीत केले जातील.

- **तहसीलदार अंधेरी**- पत्ता- डी.एन. रोड, भवन्स कॉलेज जवळ, अंधेरी (प.) मुंबई- ४०००५८
- **तहसीलदार बोरीवली** – पत्ता- नाटकवाला लेन, डॉ. न. रा. करोडे मार्ग, एस.व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई- ४०००९२
- **तहसीलदार कुर्ला**- पत्ता- टोपीवाला इमारत, पहिला मजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड (प.), मुंबई- ४०००८०.

**८. अर्जासोबत दाखल करावयाचे पुरावे:-**

८.१. शैक्षणिक पुराव्याची सत्यप्रत उदा. इ. ४थी पास गुणपत्रक/प्रमाणपत्र किंवा इ. १०/१२वी शालांत परीक्षा गुणपत्रक/प्रमाणपत्र.

८.२ वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म दाखल्याची सत्यप्रत.

८.३ उमेदवार संबंधित तालुक्याचा रहिवासी असल्याबाबतचा पुरावा म्हणून तहसीलदार यांचेकडील स्थानिक वास्तव्याच्या दाखल्याची सत्यप्रत.

८.४ राखीव पदासाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत. तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांनी बाबतीत (महिलांसह) नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत.

८.५ विवाहीत महिला असल्यास त्याबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नाव बदलाबाबतचे प्रतिज्ञापत्र.

८.६ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ व दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८.७ उमेदवाराचे अलिकडील १ महीन्याच्या कालावधीत काढणेत आलेले पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत छायाचित्र त्यापैकी एक छायाचित्र अर्जावर योग्य ठिकाणी चिकटवून स्वतःची स्वाक्षरी त्यावर करावी.

८.८ अर्ज सादर करताना लिफाफयावर मुंबई उपनगर जिल्हा कोतवाल भरती-२०२३, तालुका (अंधेरी, बोरिवली व कुर्ला (यापैकी १ नमूद करणे आवश्यक) ठळक अक्षरात नमूद करावे.

**९. अर्ज स्विकृती :-**

९.१ उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सहपत्रासह उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यांवरील तहसील कार्यालय अंधेरी किंवा बोरीवली किंवा कुर्ला येथे **दि. ०५/०७/२०२३ पासून ते दि. १७/०७/२०२३** रोजी संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने बंद लिफाफ्यात (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने दाखल करावेत.

९.२. विहित नमुन्यातील अर्जामधील माहिती /तपशील सुस्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

९.३. उमेदवार ज्या तहसिल क्षेत्रातील रिक्त पदांसाठी अर्ज करणार आहे त्याच तहसिल कार्यालयात सदर अर्ज स्विकारला जाईल. (उदा. तहसीलदार अंधेरी येथील रिक्त पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी तहसीलदार अंधेरी कडेच विहीत मुदतीत अर्ज सादर करावा. एक उमेदवार दोन तालुक्यांतून अर्ज दाखल करू शकणार नाही. तसेच एका तहसीलदार कार्यालयात अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराचा रहिवास अन्य तालुक्यातील असल्याचे निदर्शनास आल्यास असा अर्ज फेटाळला जाईल. अन्य तालुक्यातील नियुक्ती करीता देखील या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

९.४ या जाहिरातीला अनुसरून ज्या उमेदवाराचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी शासनाकडे, जिल्हाधिकारी कार्यालयास, उपविभागीय कार्यालयास किंवा तहसील कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

९.५ विहित नमुन्यातील नसलेले अर्ज, विहित शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहित शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, वयाची अट पूर्तता न करणारे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला अर्ज आणि विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९.६. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची, नेत्यांची, सन्माननीय मंत्री / अधिकारी/ समाजातील अन्य प्रतिथयश व्यक्तींची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा सदरील अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**१०. अर्जाची फी व परीक्षा शुल्क:-**

१०.१ अर्जाचे शुल्क रु. २०/-

१०.२ परीक्षा शुल्क (रुपये)

अ) खुला प्रवर्ग - ७००/-

ब) मागासवर्गीय/आर्थिक दुर्बल घटक प्रवर्ग- रु. ५००/-

१०.३. उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

१०.४. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

१०.५ उपरोक्त परीक्षा शुल्क हे डिमांड ड्राफ्ट (DD) द्वारे "तहसिलदार अंधेरी तथा सदस्य सचिव, कोतवाल निवड समिती" यांचे नावे सदर अर्जासोबत जोडावा. सदर रकमेचा धनादेश (चेक) स्विकारला जाणार नाही. धनादेश जोडलेला अर्ज फेटाळला जाईल.

१०.६ विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रीयेकरीता विचार केला जाणार नाही.

१०.७ परीक्षा शुल्काचा भरणा हा कोणत्याही कारणास्तव अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची दखल या कार्यालयाकडून घेतली जाणार नाही.

## ११. हरकती / सूचना व परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणेबाबत:-

११.१ प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून **दि. २०/०७/२०२३** रोजी मा. जिल्हाधिकारी यांच्या "https://mumbaisuburban.gov.in/" या अधिकृत वेबसाईटवर, तहसील कार्यालये अंधेरी, बोरीवली, कुर्ला तसेच उपविभागीय अधिकारी पश्चिम उपनगर/पूर्व उपनगर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर परिक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल.

११.२. अर्जाचे पात्र, अपात्रतेबाबत कोणाचे आक्षेप / हरकती असल्यास त्यांचे आक्षेप उमेदवारास तहसील कार्यालय अंधेरी, बोरीवली, कुर्ला यांचे कार्यालयात समक्ष आणून देवून लेखी पुराव्यासह **दि. २१/०७/२०२३ व २४/०७/२०२३** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करता येतील.

११.३. आक्षेप/ हरकती प्राप्त झाल्यास त्यावर अंतीम निर्णय घेवून **दि. २६/०७/२०२३** रोजी परीक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम यादी प्रसिध्द केल्यानंतर कोणतेही आक्षेप स्विकारण्यात येणार नाही.

## १२. परीक्षा ओळखपत्र:-

१२.१ **दि. २७/०७/२०२३** रोजी परीक्षा ओळखपत्रे संबंधित तहसील कार्यालयांमार्फत पोस्टाने व ईमेल-द्वारे निर्गमित करण्यात येतील.

१२.२ परीक्षा केंद्राची माहीती ही उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर नमुद करण्यात येईल.

१२.३ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह संबंधित तहसील कार्यालयाकडे संपर्क साधावा. संबंधीत तहसील कार्यालयातून दुय्यम प्रवेशपत्र देण्यात येतील.

१२.४ पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेचे स्थळ व वेळ प्रवेशपत्राद्वारे लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

१२.५ लेखी परीक्षेसाठी उमेदवारांनी प्रवेश पत्रावरील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

## १३. परीक्षा केंद्राविषयी नियमावली:-

१३.१. उमेदवार स्वतःच्या जोखमीवर परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहतील. कोणत्याही स्वरुपातील इजा किंवा नुकसानीसाठी परीक्षा आयोजक संस्था जबाबदार राहणार नाही.

१३.२. परीक्षेसाठी प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारास परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

१३.३ परीक्षेच्यावेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

१३.४ उमेदवारास परीक्षा केंद्रामध्ये मोबाईल, ब्लू टूथ, स्मार्ट वॉच, कॅलक्युलेटर, इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादी आणण्यास मनाई आहे. अशी उपकरणे आणल्यास त्याने ती वैयक्तीक जबाबदारीवर नेमून दिलेल्या ठिकाणी स्विच ऑफ करून ठेवणे आवश्यक असेल. अशी उपकरणे, इतर ठेवलेले साहीत्य गहाळ झाल्यास, चोरीला गेल्यास त्याबाबत परीक्षा संयोजक जबाबदार राहणार नाहीत. तरी उमेदवाराने स्वत:हून अशी उपकरणे परीक्षा केंद्रावर न आणणे योग्य ठरेल.

१३.५ मूळ ओळखपत्रावरील माहिती उपस्थिती अहवाल व सादर करण्यात आलेल्या ओळखीच्या पुराव्यांची सत्यता पर्यवेक्षकांकडून तपासण्यात येईल. उमेदवाराच्या ओळखीबाबत शंका उपस्थित झाल्यास त्याला/तिला परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी नाकारण्यात येईल.

**१४. उत्तरतालिका:-**

१४.१ लेखी परिक्षा झाल्यानंतर त्याच दिवशी मा. जिल्हाधिकारी यांच्या "https://mumbaisuburban.gov.in/" या अधिकृत वेबसाईटवर प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येईल.

१४.२ प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द केल्यानंतर कोणाचे आक्षेप / हरकती असल्यास त्यांचे आक्षेप अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांच्या कार्यालयाकडे लेखी व "sdomsdest@gmail.com" या ई-मेल आयडीवर पुराव्यासह **दि. ०७/०८/२०२३** रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

१४.३. आक्षेप/ हरकती प्राप्त झाल्यास त्यावर अंतीम निर्णय घेवून **दि. ०७/०८/२०२३** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात येईल.

**१५. निकाल:-**

१५.१ लेखी परिक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तानिहाय व प्रवर्गनिहाय **दि. ०८/०८/२०२३** रोजी नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांची यादी व प्रतिक्षायादी सर्व संबंधित तहसीलदार कार्यालये व उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर / पुर्व उपनगरे यांचे कार्यालयातील नोटीस फलकावर तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या "https://mumbaisuburban.gov.in/" या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

१५.२ गुणांनुसार परिगणन केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांचे समान गुण झाल्यास, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील दि. २७/०६/२००८ चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. समान गुण असलेल्या उमेदवारांचा क्रम खालील निकषावर क्रमवार लावला जाईल.

(अ) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेल्या उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे, त्यानंतर

(ब) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी ११९०- पुर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने; त्यानंतर

(क) वय (वयाने जेष्ठ असलेल्याचा क्रम वरती लागेल)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**१६. अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्धी व नियुक्ती आदेश वाटप:-**

१६.१ निकाल जाहीर केल्यानंतर **दि. ०८/०८/२०२३** रोजी अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

१६.२ पात्र उमेदवारांना संबंधित तहसीलदार कार्यालयांकडून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

**१७. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

१७.१. मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत संबंधित जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने नोंदणीकृत नोटरी प्रतिज्ञापत्र नियुक्तीवेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच उमेदवार ज्या जात प्रवर्गात मोडत आहे त्या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

१७.२. निवड झालेल्या उमेदवारांना शारीरिक क्षमतेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**१८. नियुक्तीच्या पदावर हजर होणे:-**

१८.१ नियुक्तीचे आदेशाच्या दिनांका पासून पुढील ३० दिवसांत सदर उमेदवारांनी संबंधित नियुक्ती अधिकारी यांचेकडे हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीमध्ये हजर न झाल्यास नियुक्तीच्या आदेश रद्द करण्यात येतील. शेवटचा दिवस सुटीचा दिवस असल्यास त्यापुढील कार्यालयीन दिवस हा अंतिम दिनांक समजण्यात येईल.

१८.२ नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध केल्यानंतर सदर उमेदवारांनी संबंधित तहसील कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन हजर होते वेळी अर्जासोबत दाखल केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळप्रती तपासणीसाठी सादर कराव्यात.

१८.३ मूळ कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र उमेदवारांचीच निवड वैध समजण्यात येईल. तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास नियुक्तीसाठीचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

१८.४ निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झाल्यापासून ३० दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षाधिन यादी मधील पात्र उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

१८.५ जर एखाद्या उमेदवाराने नियुक्तीवेळी कोतवाल पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.

**१९. अपात्रता:-**

निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरती प्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला/तिला निवड प्रक्रिये दरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कोणत्याही भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरती प्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२०. **भरतीनंतर रिक्त पदे प्रतिक्षायादी मधून भरणे:-**
भरती प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर रिक्त होणारी पदे नियुक्ती अधिकारी यांचेमार्फत भरणेकरीता १ वर्षाकरीता प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

२१. **कोतवाल भरतीचा कालबद्ध कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे:-**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | प्रस्तावित वेळापत्रक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | वर्तमान पेपर जाहीरात/ जाहीरनामा प्रसिद्ध करणे | ०५/०७/२०२३ (बुधवार) | १. तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर /पुर्व उपनगर<br>३. मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| २. | अर्ज विक्री व स्विकारणे (कार्यालयीन वेळेत) | ०५/०७/२०२३ (बुधवार) ते १७/०७/२०२३ (सोमवार) रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत | तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला |
| ३. | अर्जांची छाननी करून परीक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | २०/०७/२०२३ (गुरूवार) | १. तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर/पुर्व उपनगर<br>३. मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | अर्जाच्या पात्र, अपात्रतेबाबत कोणाचे आक्षेप / हरकती लेखी पुराव्यांसह नोंदविणे | २१/०७/२०२३ (शुक्रवार) व २४/०७/२०२३ (सोमवार) रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत | तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला |
| ५. | आक्षेप हरकती प्राप्त झाल्यास त्यावर अंतीम निर्णय घेवून परीक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची अंतीम यादी प्रसिध्द करणे | २६/०७/२०२३ (बुधवार) | १. तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला<br>२. उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर /पुर्व उपनगर<br>३.मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | परिक्षा ओळखपत्र तयार करून पोस्टामार्फत /ई-मेलद्वारे पाठविणे | २७/०७/२०२३ (गुरूवार) | -- |
| ७. | लेखी परीक्षा | ०६/०८/२०२३ (रविवार) (वेळ- सकाळी ११ ते १२.००) | मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ८. | उत्तरतालिका प्रसिद्ध करणे | ०६/०८/२०२३ (रविवार) (परीक्षा कालावधीनंतर) | मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ९. | उत्तरतालिकेवर आक्षेप / हरकती घेणे | ०७/०८/२०२३ (सोमवार) दुपारी १२.०० वाजेपर्यंत | उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडे लेखी व "sdomsdest@gmail.com" या ई-मेलवर घेण्यात येतील.<br>पत्ता- प्रशासकीय इमारत, नववा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ |
| १०. | अंतिम उत्तरतालिका प्रसिद्ध करणे | ०७/०८/२०२३ (सोमवार) सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ११. | प्रवर्ग व गुणवत्तानिहाय लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांची यादी तयार करून अंतिम निवड यादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करणे. | ०८/०८/२०२३ (मंगळवार) | १. तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला<br>२. उपविभागीय अधिकारी मुंबई पश्चिम उपनगर / पुर्व उपनगर कार्यालय<br>३. मा. जिल्हाधिकारी यांच्या https://mumbaisuburban.gov.in/ या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| १२. | नियुक्ती आदेश निर्गत करणे | ०९/०८/२०२३ (बुधवार) | तहसील कार्यालय, अंधेरी, बोरीवली व कुर्ला |

**२२. सर्वसाधारण सूचना:-**

१. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारणा केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

२. लेखी परीक्षा व कागदपत्रे पडताळणीसाठी येण्या जाण्याचा खर्च स्वतः करावा लागेल.

३. जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास अधिनियम व नियम, शासन परीपत्रक, मा. न्यायाल्याचे निर्देश व शासन निर्णय अंतीम राहील.

४. वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

५. सदर जाहिरात तहसील कार्यालय अंधेरी, बोरीवली, कुर्ला तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर व उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पूर्व उपनगर येथील नोटीस बोर्डवर व

मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयाच्या "https://mumbaisuburban.gov.in/" या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

६. वरील नमुद जाहीरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवडप्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहीती तहसील कार्यालय अंधेरी, बोरीवली, कुर्ला तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पश्चिम उपनगर व उपविभागीय अधिकारी कार्यालय, मुंबई पूर्व उपनगर येथील नोटीस बोर्डवर व मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयाच्या "https://mumbaisuburban.gov.in/" या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच ई-मेलद्वारे उमेदवारास कळविण्यात येईल.

**ठिकाण**: वांद्रे, मुंबई
**दिनांक**: ०५/०७/२०२३

| | | |
|---|---|---|
| **सदस्य सचिव,<br>कोतवाल निवड समिती<br>तथा तहसिलदार अंधेरी** | **सदस्य, कोतवाल निवड समिती<br>तथा उप विभागीय अधिकारी<br>मुंबई पूर्व उपनगर** | **अध्यक्ष, कोतवाल निवड समिती<br>तथा उप विभागीय अधिकारी<br>मुंबई पश्चिम उपनगर** |

# मुंबई उपनगर जिल्हा कोतवाल भरती - २०२३

## कोतवाल पदासाठी अर्ज

| केवळ कार्यालयीन वापरासाठी | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| अर्ज केलेला जातीचा प्रवर्ग | |

(उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा अलीकडील १ महीना कालावधीतील रंगीत व स्वसाक्षांकीत फोटो)

प्रति,

| मा. तहसिलदार | अंधेरी/ | बोरीवली/ | कुर्ला |
|---|---|---|---|
| | | | |

(लागू असलेल्या रकान्यात (✓) अशी खूण करावी.)

"मुंबई उपनगर जिल्हा कोतवाल भरती २०२३" च्या जाहीरनाम्याप्रमाणे मी या तालुक्यातील ........................ (**ज्या तालुक्यासाठी अर्ज करत आहात त्या तालुक्याचे नाव नमूद करावे**) कोतवाल पदासाठी अर्ज करत असून, जाहिरातीत नमूद केले प्रमाणे आवश्यक असलेली वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१. आडनाव पहिले नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठी ..........................................................................................................................

इंग्रजी ..........................................................................................................................
(Capital Letters)

२.पत्र व्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह)

मराठीत..........................................................................................................................

..........................................................................................................................

इंग्रजीत (Capital Letters) ..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

३. दूरध्वनी क्रमांक ....................................४. मोबाईल क्रमांक.. ................................................

५. ई-मेल आयडी ..........................................................................................................

६. लिंग .........................(पुरुष/स्त्री)

७. अ. अर्जदाराची जन्मतारीख (**अक्षरी**) ..........................................................................................

अर्जदाराची जन्मतारीख (**अंकात**) दिनांक .................... महिना .............. वर्ष ..............

ब. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १७/०७/२०२३ रोजी पूर्ण होणारे वय- .......वर्ष ......महिना ...... दिवस
(शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म नोंदीचा दाखल्याची साक्षांकीत प्रत जोडावी)

क. आधारकार्ड क्र. ..........................................................................................................

८. अर्जदाराचा मूळ रहिवासाचा पत्ता:- ..........................................................................................

..........................................................................................................................................

९. अ. अर्जदार ज्या तालुक्यासाठी अर्ज करत आहे त्या तालुक्याचे नाव ..................................................
ब. अर्जदार त्या तालुक्याचा स्थानिक रहिवासी आहे काय? (होय/नाही) ..................................................

१०. वैवाहिक स्थिती (विवाहीत/अविवाहीत) :- ..................................................

११. ज्या प्रवर्गातून अर्ज सादर करीत आहे. तो प्रवर्ग नमूद करणे आवश्यक आहे. (खालील चौकोनात/ कंसात (✓) अशी खूण करावी. सोबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेतलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे.

| अ.जा. | अ.ज. | वि. जा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचा (नॉन क्रिमीलेअर) दाखला अ.जा व अ.ज. वगळून अन्य मागास संवर्गाच्या उमेदवारांनी (त्या प्रवर्गातील महीलांसह) सादर करणे आवश्यक आहे.)

१२. महिला आरक्षणातून अर्ज सादर केला आहे किंवा नाही:- ..................................................

१३. उच्चतम शैक्षणिक अर्हता :- ..........................................................................................

१४. परीक्षा शुल्क (मागासवर्गीयांसाठी रक्कम रुपये ५००/- व खुल्या प्रवर्गासाठी रक्कम रुपये ७००/-)
"तहसिलदार अंधेरी तथा सदस्य सचिव, कोतवाल निवड समिती" यांचे नावे डी.डी. काढावा.

रक्कम रुपये ..................................................

डी. डी. नंबर ..................................................

बँकेचे नाव व शाखा ..........................................................................................

**<u>सोबत जोडावयाची कागदपत्रे:- रकान्यामध्ये (होय/नाही) नमूद करावे.</u>**

| अ.क्र. | कागदपत्रे | (सोबत जोडले आहे होय/नाही) |
|---|---|---|
| १. | तहसीलदार यांचेकडील स्थानिक वास्तव्याचा दाखला | |
| २. | वयाचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखल्याची सत्यप्रत) | |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा (इ. ४थी पास गुणपत्रक/ प्रमाणपत्र किंवा इ. १०/१२वी शालांत परीक्षा गुणपत्रक/प्रमाणपत्र) | |
| ४. | जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) | |
| ५. | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) | |
| ६. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (नमुना-अ) | |
| ७. | परीक्षा शुल्क भरणा केलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ डी. डी. | |
| ८. | आधारकार्ड प्रत | |

# स्वघोषणापत्र

मी श्री./श्रीमती ......................................................................................................................

असे प्रमाणित करतो/करते की, तहसीलदार ............ आस्थापनेवरील "कोतवाल पद भरती-२०२३ चा" जाहीरनामा मी काळजीपूर्वक वाचला असून सदर जाहिरनाम्यातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्टर्थ प्रमाणपत्राच्या साक्षाकित सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहेत. वर नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक.. ..................

ठिकाण ......................                                        (उमेदवाराचे संपूर्ण नाव व सही)

टिप:-

१. शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याची सत्यप्रत म्हणून इ. ४थी पास गुणपत्रक/ प्रमाणपत्र किंवा इ. १०/१२वी शालांत परीक्षा गुणपत्रक/प्रमाणपत्र)

२. वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म दाखल्याची सत्यप्रत

३. उमेदवार संबंधित तालुक्याचा रहिवासी असल्याबाबतचा पुरावा स्थानिक वास्तव्याचा दाखला.

४. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत सक्षम अधिका-याने दिलेला जातीच्या दाखल्याची साक्षांकित केलेली प्रत.

५. उमेदवाराचे अलिकडील १ महीन्याच्या कालावधीत काढणेत आलेले पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत छायाचित्र त्यापैकी एक छायाचित्र अर्जावर योग्य ठिकाणी चिकटवून स्वतःची स्वाक्षरी त्यावर करावी.

६. अर्जाचे शुल्क मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ५००/- व इतर उमेदवारांसाठी रु. ७००/- चा डिमांड ड्राफ्ट हा अंधेरी, बोरीवली व कुर्ला या तिन्ही तालुक्यांसाठी "तहसिलदार अंधेरी तथा सदस्य सचिव, कोतवाल निवड समिती" यांचे नावे असलेला जोडणे आवश्यक आहे.

७. अर्ज ज्या लिफाफयामधून सादर करणार आहे त्या लिफाफयावर मुंबई उपनगर जिल्हा कोतवाल भरती-२०२३, तालुका-: (अंधेरी, बोरीवली व कुर्ला यापैकी १ नमूद करणे आवश्यक) ठळक अक्षरात नमूद करावे.

८. महिला उमेदवारांचे नाव बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा नाव बदलाबाबत प्रतिज्ञा करणे आवश्यक

९. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ नुसार प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाचा लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

प्रतिज्ञापत्र (विवाहीतांसाठी)
नमुना अ
(नियम ४ पहा)

मी, श्री./श्रीम. ..................................................................................................................

श्री./श्रीम.................................................................................................... यांचा/यांची

मुलगा/मुलगी/पत्नी वय ........ वर्ष- ..................... रा. ......................................

.......................................... .......................याद्वारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो/करते की,

१. मी कोतवाल पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे

२. आज रोजी मला ....... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह (अपात्र) ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण:-**

**दिनांक:- / /२०२३** **अर्जदाराची सही व नाव**